वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.NO.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि.१३ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## चला लागा कामाला, जि.प.च्या ६१ गटाचे आरक्षण जाहीर

# कही खुशी कही गम, आता लावा जोरदार दम

### नेकनूरची जि.प. सुटली ओबीसीला, सचिन शिंदेंचा मार्ग झाला मोकळा

### राजाभैय्यांची नेकनूरमध्ये जोरदार चर्चा, शोएब आमदार-बाबासर ही उतरणार पं.स.च्या आखाड्यात



नेकनूर मध्ये आजपासून जि.प., पं.समितीच्या निवडणूकीसाठी आता जोरदार घमासान सुरू झाले असून नेकनूर जि.प गट हे ओबीसीसाठी सुटले आहे तर नेकनूर आणि मांजरसुंबा हे दोन पंचायत समितीचे गण असून आता या सर्कलमध्ये जोरदार लढत पहावयास मिळणार आहे. नेकनूरचे उपसरपंच सचिन शिंदे यांचा मार्ग मोकळा झाला असून सर्व समाजाची मैत्रीपुर्ण संबंध आणि प्रत्येकाच्या सुखदुखात नेहमी पुढे असणारे आणि धर्मनिरपेक्ष चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आज सुटलेल्या आरक्षणामुळे त्यांचा मार्ग मोकळा झाला असून नेकनूर जि.प. सर्कलमध्ये आता रंगतदार लढत पहावयास मिळणार आहे.

Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

### बीडमध्ये चौसाळा, लिंबागणेश मध्ये होणार जोरदार लढत
### नेकनूरमध्ये पंचायत समितीमध्येही होणार जोरदार टक्कर

जिल्हा परिषद गट ::

१) रेवकी:सर्वसाधारण महिला २) तलवाडा : सर्वसाधारण ३) जातेगाव :सर्वसाधारण ४) गढी :सर्वसाधारण ५) धोंडराई :सर्वसाधारण महिला ६) उमापूर : ओबीसी(महिला) ७) चकलांबा: ओबीसी ८) मादळमोही :सर्वसाधारण महिला ९) पाडळसिंगी:सर्वसाधारण १०) केसापुरी : अनुसूचित जाती ११) गंगामसला :ओबीसी १२) टाकरवण :सर्वसाधारण महिला १३) तालखेड :अनुसूचित जाती १४) पात्रुड :सर्वसाधारण महिला १५) दिंद्रुड :सर्वसाधारण महिला १६) उपळी: ओबीसी (महिला) १७) चिखलबीड :सर्वसाधारण १८) राजुरी:सर्वसाधारण महिला १९) बहिरवाडी:सर्वसाधारण महिला २०) पिंपळनेर:सर्वसाधारण २१) नाळवंडी :सर्वसाधारण महिला २२) पाली :सर्वसाधारण महिला २३) नेकनूर: ओबीसी २४) लिंबागणेश :सर्वसाधारण २५) चौसाळा:सर्वसाधारण २६) घाटशिळ पारगाव :सर्वसाधारण महिला २७) रायमोहा :सर्वसाधारण २८) पाडळी: ओबीसी(महिला) २९) पिंपळनेर :सर्वसाधारण ३०) डोंगरकिन्ही: ओबीसी ३१) अंमळनेर :ओबीसी ३२) पारगाव घुमरा:सर्वसाधारण ३३) दौलावडगाव :सर्वसाधारण महिला ३४) धामणगाव:सर्वसाधारण ३५) धानोरा :सर्वसाधारण महिला ३६) लोणी (स) :सर्वसाधारण महिला ३७) कडा :सर्वसाधारण महिला ३८) मुर्शदपुर:सर्वसाधारण ३९) आष्टा ह ना. : सर्वसाधारण महिला ४०) विडा:सर्वसाधारण महिला ४१) येवता :ओबीसी( महिला) ४२) आडस : ओबीसी ४३) होळ :अनुसूचित जाती (महिला) ४४) चिंचोलीमाळी :ओबीसी(महिला) ४५) नांदुरघाट :ओबीसी(महिला) ४६) युसूफवडगाव :सर्वसाधारण ४७) तेलगाव :अनुसूचित जाती (महिला) ४८) भोगलवाडी : अनुसूचित जमाती ४९) आसरडोह :ओबीसी ५०) सिरसाळा :सर्वसाधारण ५१) पिंप्री :अनुसूचित जाती ५२) मा?डवा (परळी) :सर्वसाधारण महिला ५३) मोहा :अनुसूचित जाती ५४) जिरेवाडी :अनुसूचित जाती (महिला) ५५) धर्मापुरी : ओबीसी ५६)जोगाईवाडी :सर्वसाधारण ५७) घाटनांदूर :सर्वसाधारण महिला ५८) पट्टीवडगाव :सर्वसाधारण ५९) बर्दापुर :ओबीसी(महिला) ६०) चनई : ओबीसी(महिला) ६१) पाटोदा म. :अनुसूचित जाती (महिला)

### राजाभैय्यांची जोरदार चर्चा
### आता पर्याय राजाभैय्याच...



नेकनूरचे माजी सरपंच आणि विद्यमान ग्रामपंचायत सदस्य राजाभैय्या यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली असून आरक्षण सोडत पूर्ण झाल्यानंतर नेकनूरमध्ये वातावरण तापू लागले आहे. नेकनूर परिसरात सर्वात परिचित आणि विकास कामात नेहमी पुढे असणारे राजाभैय्या हे नेकनूरचे सरपंच राहिलेले आहेत. त्यांच्या कार्यकाळात अनेक विकास कामे त्यानी केले आहेत. प्रत्येकांची मैत्रीपुर्ण संबंध आणि सुखदु:खात नेहमी पुढे असणारे राजाभैय्यांची यांच्या नावाची चर्चा जोर धरू लागली असून आता पर्याय राजाभैय्या हेस असल्याची चर्चा नेकनूर परिसरात दिसून येत आहे.

### बाबासरांची चर्चा आणि अनेकांना घेतला धसका



नेकनूरमध्ये बाबासर हे सर्वांना परिचित आणि प्रत्येकांशी प्रेमाने आणि सलोख्यानी राहणारे व्यक्तीमहत्व म्हणून परिचित आहेत. समाजसेवक म्हणून ते नेकनूर परिसरात आणि बीड मध्ये त्यांचे चांगले काम आहे. अत्यंत दांडगा जनसंपर्क आणि सामाजिक कार्यात नेहमी पुढे असणारे बाबासरांची चर्चा आणि नेकनूरमध्ये अनेकांनी घेतला धसका अशी परिस्थिती सकाळपासून आरक्षण सोडत पूर्ण झाल्यानंतर दिसून येत आहे.बाबासरांना आता पंचायत समितीमध्यें नक्कीच संधी मिळणार अशी ही चर्चा नेकनूरमध्ये होत असून आता कोण बाजी मारतो याकडे नेकनूरच कराचे लक्ष लागून आहे.

### नेकनूरचा खडा न खडा माहित असणारे शोएब आमदार आखाड्यात उतरणार...



नेकनूरचे जेष्ठ नेते आणि भाजपाचे नेत्या राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे खंदे समर्थक आणि विश्वासू असलेले शोएब आमदार हे पंचायत समितीच्या आखाड्यात पूर्ण ताकदीने उतरणार आहेत. नेकनूर सह संपूर्ण जिल्ह्यात आमदार म्हणून परिचित असलेले सय्यद शोएब हे नेकनूरच्या प्रत्येक बारीक सारीक प्रकरणात पुढे असतात नेहमी विकास काम घेवून ते पंकजाताईंकडे पाठपुरावा करतांना दिसून येतात. पंकजाताईंचाही त्यांच्यावर विश्वास असून ते पंकजाताईंचे सर्वात विश्वासू म्हणून नेकनूरमध्ये परिचित आहेत. खासदार असो की आमदाराची निवडणूक असो त्यांनी पक्षाची इमाने एतबारे काम केले आहे. नेकनूर ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या अनागोंदी कारभाराचा भांडाफोड त्यांनीच केला. आता पंचायत समितीमध्ये ते निवडणूक लढवून नेकनूरच्या विकासासाठी पंचायत समितीच्या सभागृहात जाणार असल्याची चर्चा नेकनूर परिसरात होत आहे.

## सलीम बागवान यांची पत्नी नसीम सलीम बागवान नगराध्यक्ष पदाच्या रिंगनात उतरणार



जामखेड (दिव्य न्युज):- २०१६ मधे संजय गांधी निराधार समिति व सदस्य झाल्यावर गरीब लोकांना अंत्योदय मंधे अन्य धन्य मिळऊन दिले .विधवा अपंग निराधार महिलाना ढोल (पगार )मंजूर करुन दिले २०१७ ला पंतप्रधान १५ कलमी कार्यक्रम अंतर्गत अहमदनगर जिला अल्पसंख्यक कल्याण समिति अ शासकीय सदस्य पदी निवड झाल्या वर अहिल्यानगर जिला मधे अल्पसंख्यक निधि आणला अल्पसंख्यक समाजा साठी शाळा कॉलेज ला मान्यता आणली मोठ्या संख्याने जिल्या मधे कामे केली २०२२ मधे महाराष्ट्र राज्य हज कमेटी वर सदस्य पदी निवड झाल्या वर छत्रपति संभाजी नगर शहरा मधे हज हाउस की निर्मिती केली. अहिल्या नगर जिल्ह्यातून हज यात्री साठी जानारे लोकां साथी सुख सुविधा उपलब्ध करूं दिल्या पूर्ण महाराष्ट्र मधे हज यात्रा ला जानारे हाजी साठी सुख सुविधा उपलब्ध करुन दिले. जामखेड शहरा मधे सलीम बागवान हे नाव सलीम काका रिक्शा वाले म्हणून प्रसिद्ध आहे जामखेड शहरा मधे १५ वर्ष रिक्शा चालऊन शालेय मुलांची सेवा केली .व घर प्रपंच चालून सामाजिक कामाची आवड असल्यामुळे समाजसेवा ▶▶ पान २ वर

### स्क्रॅब विक्रेते आरेफ खान जहॉगिरदार यांचे वडील महेमूद खान जहॉगिरदार यांचे दु:खद निधन



बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरातील भालदार पुरा येथील रहिवाशी सर्वांना परिचित असलेले महेमूद खान जहाँगिरदार यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांची जनाजा नमाज आज रात्री ९.३० वाजता बारादरी मस्जिदच्या परिसरात अदा केली जाईल. महेमूद खान जहाँगिदार हे स्क्रॅब विक्रेते आरेफ खान जहाँगिरदार, आसेफ खान जहाँगिरदार, लड्डो जहाँगिरदार यांचे वडील होते. जहाँगिरदार कुटूंबियांच्या दुखात कश्मकश, दिव्य वार्ता परिवार सहभागी आहे.

### प्रभाग क्र.१७ मध्ये होणार एकतर्फी लढत
## सामाजिक कार्यात नेहमी पुढे असणारे शेख बिलाल लढविणार निवडणूक



बीड (दिव्य न्युज):- आरक्षणाची सोडत झाली आता प्रत्येक ठिकाणी भावी उमेदवार आपआपल्या परीने आपल्या प्रभागात मतदारांच्या गाठीभेटी घेऊन आशिर्वाद द्यावा आणि निवडणूकीत विजय करावा असे आवाहन करत मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. सर्वात जास्त चर्चेचा प्रभाग असलेल्या प्रभाग क्रमांक १७ असुन अजिजपुरा, कारंजासह इतर परिसर या प्रभागात येतो. नेहमी आणि प्रत्येकवेळी समाजाच्या सुख दु:खात पुढे असणारे आणि सामाजिक कार्यात सातत्याने सक्रीय असणारे शेख बिलाल मंजुर ▶▶ पान २ वर

### 'हिंदूंकडून खरेदी' वक्तव्यानंतर संग्राम जगतापांची राष्ट्रवादीत अडचण
## पण पडळकर मदतीला धावले

मुंबई, (दिव्य न्युज):- दिवाळीच्या खरेदीदरम्यान हिंदूंनी हिंदूकडूनच खरेदी करावी या वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत आलेले अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांना पक्षनेते अजित पवार यांनी कारणे दाखवा नोटीस पाठविण्याची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी जगताप यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत त्यांना स्पष्ट पाठिंबा दर्शविला आहे.

पडळकर म्हणाले, आमदार संग्राम जगताप यांनी काही चुकीचे बोललेले नाही. ते आपल्या



भूमिकेवर ठाम आहेत आणि नोटिशीला उत्तर देण्याची त्यांच्यात पूर्ण क्षमता आहे. मी त्यांच्या सोबत ठामपणे उभा ▶▶ पान २ वर

### आक्षेप घेणाऱ्यांची तुडूंब गर्दी, आज होती शेवटची तारीख
### प्रभाग १९ चे २०, २० चे २२, २१ चे २६ मध्ये असे अनेक प्रभागात गोंधळ

## बीड पालिकेच्या मतदार यादीत गोंधळ, रहिवाशी एका भागात अन् नाव दुसरीकडेच

बीड, (दिव्य न्युज):- बीड नगरपालिकेची प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी जाहीर झाली. ती ११ ऑक्टोबर रोजी समाज माध्यमावर प्रसिध्द झाली तेव्हा त्यामध्ये मोठे प्रमाणात गोंधळ असल्याचे दिसून आले. रहिवाशी एकीकडे आणि मतदान दुसरीकडे गेले असल्याने एकच गोंधळ उडाला. गांधी नगर भागातील वार्ड २१ मधील १ ते १७६३ क्रमांकाचे मतदार थेट वार्ड क्र. २६ मध्ये



दिसत आहेत. यावर आज सोमवार १३ ऑक्टोबर दुपारी ३ वाजेपर्यंत आक्षेप नोंदवता येणार आहे.नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर इच्छुक उमेदवार कामाला लागले आहेत. बुधवारी प्रारूप मतदार यादी जाहिर झाल्यानंतर यातील घोळ ▶▶ पान २ वर

## बोगस शिक्षक भरती अंगलट
### मालेगावात तीन शिक्षण अधिकारी निलंबित



मालेगाव, (दिव्य न्युज):- मालेगाव शहरासह जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात गाजलेल्या येथील बोगस शिक्षक भरती घोटाळा प्रकरणात अखेर शिक्षण विभागातील तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना शासनाने निलंबित केले.निलंबित अधिकऱ्यांमध्ये जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षण अधिकारी प्रवीण पाटील, उपशिक्षण अधिकारी उदय देवरे, तत्कालीन वेतन अधीक्षक सुधीर पगार यांच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. शालेय शिक्षण ▶▶ पान २ वर

# खासगी मेडिकलची झाडाझडती होणार
### कफ सिरफ प्रकरणानंतर अन्न औषध प्रशासन अलर्ट, दोषींवर कारवाई

बीड, (दिव्य न्युज):- कफ सिरपच्या वापरामुळे बालकांचे मृत्यू झाल्याने सध्या पंचायत ते राजधानीपर्यंतचे वातावरण गाजले आहे. या प्रकरणानंतर राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने तपासणी मोहीम सुरू केली आहे.

बीड जिल्ह्यातील काही खासगी मेडिकल दुकाने अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून झाडाझडतीसाठी व तपासणीसाठी पावले उचलली जात आहेत. तपासणीत औषध-कंपनी डेटामधील मोठ्या प्रमाणावर तफावत, मेडिकलमधील अस्वच्छता आणि इतर बाबी आढळल्याने तीन मेडिकल चालकांना नोटीस देऊन कारवाई केली जाणार असल्याची माहिती विभागीय अधिकाऱ्यांनी दिली.

मध्य प्रदेश आणि राजस्थान राज्यांतील कफ सिरप प्रकरणात बालमृत्यूची घटना घडल्याने राज्य शासन अलर्ट झाले आहे. बीड जिल्ह्यातील अन्न व औषध विभागाने जिल्ह्यातील सर्व मेडिकलची तपासणी मोहीम राबवली आहे. या मोहिमेत काही दिवसांतच बीड शहर, गेवराई, आष्टी व शिरूर तालुका भागांत अनेक मेडिकल दुकाने तपासण्यात आली.तपासणीत काही मेडिकलमध्ये अस्वच्छता, परवाना नसताना औषध विक्री, काही औषध गोळ्यांची पान २ वर





# शरद पवार पुन्हा भाकरी फिरवणार



मुंबई, (दिव्य न्युज):- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाची महत्त्वाची बैठक पार पडली या बैठकीला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे देखील उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर आणि पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीला पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांतील खासदार आणि आमदार उपस्थित होते, या बैठकीमध्ये राज्यात पुढील काही महिन्यांमध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींबाबत देखील चर्चा करण्यात आली.

दरम्यान या बैठकीमध्ये मोठा निर्णय घेण्यात आला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ज्या तरुणांची कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही अशा तरुणांना एकूण जागांपैकी ५० टक्के जागांवर निवडणूक लढवण्याची संधी दिली जाणार आहे. जास्तीत जास्त तरुणांना संधी कशा प्रकारे देता येईल, ते बघा अशा सूचना या बैठकीत शरद पवार यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आगामी काळात कशा प्रकारे युती करायची याबाबत महाविकास आघाडीच्या नेत्यांची उद्या महत्त्वाची बैठक पार पडणार असल्याची माहिती देखील या बैठकीमध्ये देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे वातावरण चांगलंच तापलं आहे, यावर देखील या बैठकीमध्ये शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कधिकाळी एक आमदार आपल्या सोबत होता, पण तो आता काय वक्तव्य करत आहे हे सगळं माध्यमांवर येत आहे, त्यामुळे आपल्याला जातीय सलोखा बिघडवायचा नाही, जातीय सलोखा ठेवा, अशा सूचना या बैठकीमध्ये शरद पवार यांनी आपल्या पक्षातील पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. सरकारमधील काही नेते व मंत्री सध्या वादग्रस्त बोलत आहेत, मात्र आपण बोलताना प्रेमाची भाषा वापरा अशा सूचनाही यावेळी शरद पवार यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# पुतण्याच्या मारहाणीत चुलत्याचा मृत्यू

बीड, (दिव्य न्युज):- आष्टी तालुक्यातील लोणी सय्यदमीर येथे शेतीच्या वादातून तीन पुतण्यांसह तीन सुना,अशा सहा जणांनी कोयता,लोखंडी पाइपने केलेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या छबू देवकर वय (७२) या चुलत्याचा अहिल्यानगर येथील रुग्णालयात रविवारी मृत्यु झाला. ही घटना शनिवार (दि.११)रोजी संध्याकाळी ०६:३० च्या सुमारास घडली.

आष्टी तालुक्यातील लोणी सय्यदमीर येथील देवकर कुटुंबामध्ये अनेक दिवसांपासून शेतातील बांध व पाइपलाइनच्या कारणावरून धुसफूस सुरू होती. शनिवार (दि.११)रोजी संध्याकाळी ०६:३० वाजता लहान मुले चेंडू खेळत असताना झालेल्या भांडणाचे रूपांतर हाणामारीत होऊन तीन पुतणे व सुना अशा सहा जणांनी मिळून कोयता, लोखंडी पाइपने केलेल्या मारहाणीत छबू देवकर, वय ७२ हे गंभीर जखमी झाले. वादामध्ये पडलेला छबू देवकर यांचा मुलगा मिठू देवकर हाही जखमी झाला आहे. दरम्यान, हाणामारीत गंभीर जखमी झालेले छबू देवकर यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आल्यांनतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

अंभोरा ठाण्याचे सपोनि मंगेश साळवे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाची चक्रे फिरवली. दोन पथके तयार करत आरोपीच्या शोधासाठी पाठवली. लोणी सय्यदमीर गावातून रविवारी पहाटे पुतणे रामदास देवकर, राहुल देवकर, संतोष देवकर यांच्यासह सून कविता देवकर, मनीषा देवकर, लता देवकर यांना ताब्यात घेतले आहे. मयत छबू देवकर यांच्यावर लोणी सय्यदमीर गावात पोलिस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले असून, या गुन्ह्याचा तपास सपोनि मंगेश साळवे करत आहेत.

# पिंपळवंडीत चोरट्याने फोडले मशीनचे दुकान

**अंमळनेर , (दिव्य न्युज):- पिंपळवंडी येथील जय हनुमान मशिनरी,मोटार रिवायडींग या दुकानाचे अज्ञात चोरट्यांनी शटर तोडून ७४,२५० रुपयांचे साहित्य लंपास केल्याची घटना शनिवार (दि.११) रोजी रात्री घडली.**

**पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील भरत अनिल जाधव (वय २४) यांच्या पिंपळवंडी येथील जय हनुमान मशिनरी,मोटार रिवायडींग या दुकानाचे अज्ञात चोरट्यांनी शटर तोडून १० पाणबुडी मोटर असा एकूण ७४,२५० रुपयांचे साहित्य लंपास केल्याची घटना शनिवार (दि.११) रोजी रात्री घडली.या प्रकरणी भरत जाधव यांच्या फिर्यादीवरून अंमळनेर पोलीस ठाण्यात ज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.**

पान ४ वरून

## जगतापांचा हिंदुत्ववाद

तिसरे कारण म्हणजे आपला चेहरा राज्यभर नेण्यासाठी त्यांना हिंदुत्व हा मुद्दा सापडला आहे. त्यांना यातून 'टीआरपी' मिळाला आहे. सध्या ही प्रसिद्धी सर्वात सोपी आहे. त्यांना तरुणांचा आयता प्रतिसादही मिळतो आहे. आणखी एक कारण असेही आहे की, अहमदनगर शहरात अनेकांच्या मनात पक्के ठसलेले आहे की हे शहर हिंदुत्ववादी आहे. येथे हिंदुत्ववादी विचाराचे नगरसेवक व आमदारच निवडून येऊ शकतात. त्यामुळे अनेकांनी भाजपचा रस्ता धरलेला आहे. याला आधार दिला जातो तो सेनेचे अनिल राठोड यांचा येथे विधानसभेला पाचवेळा झालेला विजय. पण तो विजय एकट्या हिंदुत्वाचा होता का ? हा प्रश्न आहे. कारण तसे असते तर राठोड पराभूतच व्हायला नको होते. २०१९ साली तर राठोड व संग्राम जगताप अशी सरळ लढत झाली. त्यातही राठोड पराभूत झाले. राठोड विजयी होत होते कारण त्यांचे हिंदुत्व इतके प्रक्षोभक नव्हते. त्यांचे अनेक भाजपच्या नेत्यांशीही पटत नव्हते. काँग्रेसच्या नेत्यांतील फाटाफूट व तेव्हा काँग्रेससोबत असलेल्या जगताप, कोतकर या परिवारांची निर्माण केली गेलेली नकारात्मक प्रतिमा यात राठोड यांच्या विजयाचे गणित दडलेले होते. या परिवारांची शहराला भीती दाखवली जात होती. त्याचा फायदा सेना घेत आली.

त्यामुळे आपण हिंदुत्वाचा अजेंडा घेतला म्हणजे आपणाला अहमदनगर शहरात कुणीही पराभूत करू शकत नाही, असे जगताप यांचा कयास असेल तर ते जोखीमही घेत आहेत. यातून त्यांची कट्टर हिंदुत्ववादी प्रतिमा होईलही; पण त्यांच्यापासून धर्मनिरपेक्ष लोक दूर जातील.

२०१४ नंतर अहमदनगरची निवडणूक ही भयमुक्तीच्या नाऱ्यावरून जगतापांनी विकासाच्या नाऱ्यावर आणली होती. म्हणून लोकांनी त्यांना स्वीकारले. येथे हिंदुत्वापेक्षा विकासाचा मुद्दा महत्वाचा ठरला होता. २०२४ च्या निवडणुकीपूर्वी जगतापांनी शहरात रस्त्यांची कामे सुरू केली. त्याचा त्यांना निवडणुकीत फायदा झाला. पण आता ते विकासाकडून हिंदुत्वाकडे निघाले आहेत.

यात भाजपही गंमत पाहते आहे. जगताप जेवढे 'डॅमेज' होतील ते भाजपलाही हवेच आहे. कारण, ते 'डॅमेज' होत नाहीत तोवर भाजपच्या दुसऱ्या चेहऱ्यांना शहरात संधीच मिळणार नाही. भाजप आपल्या प्रेमात आहे, असे जगताप मानत असतील तर तो मोठा गैरसमज आहे. राठोड यांच्यानंतर अन्य कोणताही हिंदुत्ववादी चेहरा या शहरात निर्माण होऊ नये म्हणून ती जागा आपण काबीज करू, असाही जगताप यांचा अजेंडा असावा. तरुण मुले व समाज हिंदुत्वाने वेडे झाले आहेत. म्हणून हिंदू-हिंदू म्हणा व मोकळे व्हा, असेही जगताप यांना वाटत असावे, अशी अनेक कारणे असू शकतात.

## शेख शफीक

जिल्हा रुग्णालयातील सेवानिवृत्त कर्मचारी शेख अहेमद बाबन यांचे द्वितीय पुत्र होते तर स्टार ऑटो बॅटरीज चे मालक संचालक शेख अब्दुस् समद अहेमद आणि . जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी शेख शकील अहेमद यांचे बंधू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. आज दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ सोमवार रोजी त्यांच्या पार्थिवाचे दफनविधी बालेपीर दर्गा येथील कब्रस्तानात नमाज़ ए ईशा नंतर करण्यात येणार आहे. शेख कुटुंबीयांच्या दुःखात दैनिक दिव्यवार्ता परिवार सहभागी आहे.

## अहमदनगर मध्ये दोन

कोणते कोणते कारण वरुन मुस्लिम समाजाला आमदार संग्राम जगताप हे टारगेट असून ढोल समाजामध्ये वाद निर्माण करण्याचा पूर्ण प्रयत्न होत आहे. आमदार गोपीचंद पडळकर व आमदार संग्राम जगताप यांनी दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा सतत प्रयत्न चालू असून याच्या वर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावे (अहमदनगर) अहिल्या नगर आमदार संग्राम जगताप यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावतील अशे वक्तव्य केल्या प्रकरणी सकल मुस्लिम समाजाचे वतीने आपणास निवेदन करतो की जे कुणी असे वक्तव्य करीत असेल तर त्याच्या वर योग्य ती कारवाई करण्यात यावी. नसता लोकशाही मार्गाने व विविध मार्गाने आंदोलन करण्यात येईल यांची प्रशासनने नोंद घ्यावी अशी महाराष्ट्र मुस्लिम युवक प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आली

## शेतीच्या वादातून

झाले.या मारामारी मध्ये छबू देवकर यांना गंभीर मार लागला त्यामळे त्यांना अहिल्यानगर येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.मात्र त्यांना गंभीर मार लागल्याने डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.दरम्यान स.पो.नि.मंगेश साळवे यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊने परिस्थितीचा आढावा घेत तपासाची चक्रे फिरवत दोन टीम तयार करून रामदास देवकर,संतोष देवकर,राहुल देवकर,कविता देवकर,मनीषा देवकर,लता देवकर (राहणार लोणी सय्यदमीर) यांना ताब्यात घेतले आहे.दरम्यान लोणी गावांमध्ये तणावपूर्ण शांतता असून परिस्थिती नियंत्रणात आहे.मयत छबू देवकर यांच्यावर लोणी येथे पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले.गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि. मंगेश साळवे करत आहेत.

## वार्ड क्रमांक एक

साधत आपल्या विकासदृष्टीचा आराखडा मांडत आहेत. लोकांचा विश्वास, विकासाचा संकल्प आणि पारदर्शक प्रशासन हा त्यांचा मुख्य नारा आहे. वार्ड क्रमांक एक मधील तरुण वर्ग, महिला व ज्येष्ठ नागरिकांमध्ये त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या विचारधारेवर विश्वास ठेवत मोहसीन शाह यांनी सांगितले की, माझा उद्देश राजकारण करणे नसून समाजकारण करणे आहे. लोकांच्या अडचणी सोडवणे, विकासकामे पूर्ण करणे आणि धारूर शहराचा चेहरा बदलणे हीच माझी खरी उमेदवारी आहे. पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनीदेखील त्यांच्या उमेदवारीबद्दल सकारात्मक भूमिका घेतली असून, लवकरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या वार्डातील स्पर्धा अधिक रंगतदार होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. धारूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत मोहसीन शाह यांचे नाव समोर आल्याने नागरिकांमध्ये चर्चांना उधाण आले असून, यावेळी तरुण नेतृत्वाला संधी मिळावी अशी जनतेची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पान १ वरून

## सलीम बागवान यांची

केली आज सलीम बागवान यांचे जामखेड शहर बीड रोड येथे मोहिनीराज मोटर्स हे रिक्षाचे व कमरसिल मालवहातुक गाड्यांचे शोरूम आहे या शोरूम च्या माध्यमातून जामखेड शहरांमधील व तालुक्यामधील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना मोठ्या प्रमाणात फायनान्स च्या माध्यमातून बँकेच्या माध्यमातून महामंडळाच्या माध्यमातून गाड्या वितरण करण्यात आले. राजकीय क्षेत्रामध्ये जाऊन सर्वसामान्य गरीब जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अहोरात्र काम करीत आपल्या कामाचा ठसा जामखेड शहर तालुका अहिल्यानगर जिल्हा तसेच महाराष्ट्र मध्ये नावलौकिक करून मोठ्या पदावर गेलो परंतु जामखेडकरांसाठी काही करण्याची इच्छा असल्यामुळे नगराध्यक्ष पदाच्या रिंगणात त्यांची पत्नी नसीम बागवान यांना उतरून सर्व समाजाच्या लोकांवर विशासाने मताची शिदोरी मागून सर्व जामखेड नगरपालिकेच्या मतदारांचे विशास संपादन करण्याची प्रयत्न करून निवडणूक लढवणार आहे.

## सामाजिक कार्यात

हे प्रभाग क्रमांक १७ मधुन पुर्ण ताकदीने निवडणूकीच्या आखाड्यात उतरणार आहेत. या प्रभागात त्यांचा दांडगा जनसंपर्क असून मित्र परिवाराची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. प्रत्येकाच्या सुख दु:खात नेहमीच पुढे असणारे आणि गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात असणारे शेख बिलाल यांना प्रभाग क्रमांक १७ मध्ये मतदारांची पसंती आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांना उमेदवारी मिळणार असून मतदारांच्या आशिर्वादाने ते नगरसेवक म्हणून नगर पालिकेच्या सभागृहात प्रभागातील समस्या जे गेल्या काही वर्षापासून सातत्याने मतदारांना त्रस्त करून सोडल्या आहेत ते स्वच्छतेचा प्रश्न आणि स्वच्छ, वेळेवर पाण्याचा प्रश्न हा या प्रभागाचा महत्वाचा प्रश्न आहे. त्यासोबत रस्ते, नाल्या आणि विद्युत हा प्रश्न निकाली काढण्यासाठी ते या प्रभागाचा नेतृत्व करत सभागृहात आवाज उठवून हे प्रश्न निकाली काढण्यासाठी मतदारांनी त्यांना या निवडणूकीत नगरसेवक म्हणून पाठविण्याचा निश्चिय केलेला आहे. शेख बिलाल यांना या प्रभागातून निवडणूक अत्यंत सोपी असून त्याचे कारण म्हणजे त्यांचा सतत असलेला प्रभागातील मतदारांशी संपर्क. यामुळे बिलाल यांना याचा फायदा होईल आणि प्रभाग क्रमांक १७ मधुन ते एकतर्फी विजय मिळवतील असे काहिसे चित्र सध्या प्रभागात पहायला मिळत आहे.

## बीड पालिकेच्या मतदार

विधानसभेसाठी वार्ड क्रमांक २१ मध्येच मतदान केलेले आहे. मात्र नगर पालिकेच्या निवडणूकीसाठी त्यांचे नावे वार्ड क्र. २६ मध्ये आल्याने गोंधळ उडाला आहे. या प्रकरणामुळे इच्छुकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. मात्र यासाठी अक्षेप नोंदवता येणार असून त्यासाठी वाजेपर्यंतचा वेळ आहे.

आक्षेप नोंदवा, पाहणी प्रथगत करून दुरुस्त केले जाईल झा

प्रारूप मतदार यादीत जर् मतदारांचे नावे दुसऱ्या प्रभागात पडले असेल तर त्यांनी आज दुपारी ३ वाजेपर्यंत प्रभाग क्रमांक, यादी क्रमांकांसह आक्षेप नोंदविण्याचे आवाहन नगर पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले होते. तेव्हा आज सकाळपासूनच नगर पालिकेच्या परिसरात आक्षेप नोंदविण्यासाठी भावी नगरसेवकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. सर्वच प्रभागात हा गोंधळ झाल्याने आक्षेपांचा ढिगार मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात लागल्याचे चित्र दिसून आले.

## पण पडळकर

राहणार आहे. राजकीय वर्तुळात पडळकरांच्या या प्रतिक्रियेमुळे नव्या चर्चांना उधाण आले आहे. एका बाजूला अजित पवार गटात शिस्तभंगाचा मुद्दा पुढे येत असताना, दुसऱ्या बाजूला भाजप आमदाराकडून मिळालेल्या समर्थनामुळे या प्रकरणाने नव्या राजकीय समीकरणांची चाहूल लागली आहे.

आमदार संग्रामभैया बोलतात तेंव्हा वादंग तर होत राहतात. त्याला आपण थांबवू शकत नाही, पण त्यांनी जी भूमिका घेतलेली आहे, त्या भूमिकेक्कडे तुम्ही बघा ना. आज या शहरामध्ये ज्यापद्धतीने लव्ह जिहादच्या घटना घडतात, लँड जिहादच्या घटना घडतात, त्यावर रोखठोक भूमिका संग्रामभैया मांडतात. महाराष्ट्रमध्ये कुठेही कुठलाही कार्यक्रम असला तर संग्राम जगताप तिथे उपस्थित राहतात. जो माणूस भूमिका घेतोय त्याच्यामागे ठामपणे उभे राहा ना. जे भूमिका घेतच नाहीत, त्यांचं कशाला ऐकत बसताय, असं पडळकर म्हणाले आहेत.जे कुठल्याही परिणामांचा विचार न करता, मतांचा विचार न करता, जी राष्ट्रहिताची भूमिका संग्रामभैया, महेशदादा लांडगे घेत आहेत. त्यांच्या पाठीमागे तुम्ही ठामपणे उभा राहा. कुणाला काय बोलावं याच्याशी आम्हाला देणघेणं नाही, पण आम्ही जी भूमिका मांडतोय ती लोकांच्या, धर्माच्या आणि देशाच्या हिताची आहे.पुढे बोलताना, संग्राम जगताप सक्षम आहेत. कारणे दाखवा नोटीसीचा मामला हा त्यांचा अंतर्गत मामला आहे. परंतू मी संग्राम जगतापांच्या सोबत आहे. कालही होतो, आजही आहे आणि उद्याही आहे. संग्राम जगतापांसारखं काम सर्व आमदारांनी करण्याची आवश्यकता आहे, असंही यावेळी पडळकरांनी सांगितलं आहे.

## बोगस शिक्षक

अधिकाऱ्यांना आर्थिक गुन्हे शाखेने गेल्या महिन्यात अटक केली होती. ते ४८ तासांपेक्षा जास्त काळ पोलिस कोठडीत राहिल्याने त्यांच्यावर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. पुढील आदेश येईपर्यंत हे अधिकारी निलंबित राहणार आहेत. सदर शिक्षक भरती घोटाळा प्रकरण मागील काही महिन्यांपासून गाजत आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत घेतलेल्या भरती प्रक्रियेत अनेक शिक्षकांच्या नियुक्त्या बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी तिन्ही पोलिस ठाण्यांमध्ये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते.

मालेगाव येथील मालेगाव हायस्कूल व महात्मा जोतिबा फुले शिक्षण संस्थेच्या या. ना. जाधव विद्यालयात अकरा बोगस कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. या घोटाळ्याप्रकरणी पवारवाडी व छावणी पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या ग्रामीण पथकाकडून तपास सुरू आहे. आर्थिक गुन्हे शाखेने प्रवीण पाटील, सुधीर पगार व उदय देवरे यांना यापूर्वीच अटक केली होती. त्यांना पोलिस कोठडी व न्यायालयीन कोठडीदेखील सुनावण्यात आली होती. आता शासनाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

## खासगी मेडिकल

नोंद न ठेवणे इत्यादी अनेक दोष आढळले आहेत. या समस्यांमुळे परवाना निलंबनाची नोटीस देऊन त्या दुकानांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.जिल्ह्यात अंदाजे तीन हजार नोंदणीकृत मेडिकल असून, अन्न व औषध विभागाने या सर्व मेडिकलच्या तपासणीसाठी पुढाकार घेतला आहे. सर्वांत जास्त मेडिकल बीड शहरात असल्याने तिथे प्रामुख्याने तपासणी केली जाईल. दोषींवर तत्काळ कायदेशीर कारवाई होईल, असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

पालकांना सूचना

मुलांना सर्दी, खोकला झाल्यास मेडिकलवर जाऊन औषध घेण्याऐवजी प्रथम डॉक्टरांकडून तपासणी करणे आवश्यक आहे. जर रुग्णाला किडनी, लिव्हर किंवा इतर गंभीर आजार असतील, तर कफ सिरप देण्यापूर्वी वैद्यकीय सल्ल्याची खात्री घेणे अत्यावश्यक आहे. औषध सुरू करण्यापूर्वी त्याची सुरक्षितता आणि डॉक्टरांचे मत महत्त्वाचे आहे, असे अन्न व औषध विभागाने स्पष्ट केले आहे.